**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक**
**उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारत, ग्राहक न्यायालयामागे, आकाशवाणी केंद्राजवळ,
जळगांव 425001.

दुरध्वनी क्रमांक (०२५७-२२३८५१०) Web Site- jdhejalgaon.org.in E-mail-jdhe_jal@yahoo.co.in

**Comp. No.: २५५९२८० File No.: JDJAL-१३०११(११)/३११/२०२५-JDHEJAL-G IN AID**

**परिपत्रक**

**प्रति,**

**कुलसचिव,/ वित्त व लेखा अधिकारी,**
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव,
**सर्व प्राचार्य,**
अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी तसेच शिक्षणशास्त्र
महाविद्यालये, जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्हा

**विषय-एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमधील नोंदी संबधातील सर्व प्रकरणे प्रस्ताव प्रशासकीय विभागास मान्यतेस्तव सादर करणे बाबत.**

**संदर्भ-**१.शासन. पत्र क्र. सेवार्थ-२०२५/प्र.क्र.१०६/१०६९५२४/मशि-२ दि. १६.०४.२०२५
२.संचालनालयाचे पत्र क्र.अमवि/२०२५/एचटीई सेवार्थ प्रशासकीय मान्यतेस विभागास सादर करणेबाबत/ ईफाक्र.१८७१११५ जवि/मवि-२/ दि. ११.०५.२०२५
३.संचालनालयाचे पत्र क्र. अमवि/२०२५/एचटीई सेवार्थ प्रशासकीय मान्यतेस विभागास सादर करणेबाबत/ ईफाक्र.१८७१११५ जवि/मवि-२/ दि.०३.०९.२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन अकृषी विद्यापीठ तसेच सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या लॉगीनमधून नव्याने पदांचा समावेश करणे अथवा शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा समावेश करणे ही सुविधा संदर्भीय क्र. १ व २ अन्वये, रद्द करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. ३ अन्वये, शिक्षकीय व शिक्षकेत्तर कर्मचारी व पदांच्या संदर्भात सर्व प्रकारच्या नोंदी घेणे, त्यामध्ये बदल करणे अथवा सुधारणा करणे तसेच त्या अनुषंगाने इतर बदल करणे, अशी सर्व प्रकरणे शासनस्तरावरील प्रशासकीय विभागास मान्यतेस्तव सादर करण्यात यावीत. प्रशासकीय विभागाच्या मान्यतेनंतर विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये टॅब उपलब्ध केल्यानंतर महाविद्यालय स्तरावरून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

यापुढे प्रशासकीय विभागाच्या मान्यतेशिवाय कोणत्याही प्रकारची नविन नोंद तसेच इतर बदलाबाबतच्या नोंदी एच.टी ई. सेवार्थ प्रणालीमध्ये घेण्यात येऊ नये असे संदर्भीय शासन पत्र तसेच संचालनालयाच्या पत्रानुसार निर्देश दिलेले आहेत.

## एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये बदल करण्यासाठी शासन प्रशासकीय विभागाची मान्यता घेण्यासाठी सादर करावयाची प्रकरणे.

१. नवनियुक्त शिक्षक कर्मचारी यांचे सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करणे.
२. प्राचार्य यांचे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ६० वर्षावरून ६२ वर्ष दिनांकामध्ये दुरूस्ती करणे.
३. प्राचार्य यांचे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ६२ वर्षावरून ६५ वर्ष दिनांकामध्ये दुरूस्ती करणे.
४. प्राचार्य पदी निवड केलेल्या अध्यापकांची एचटीई सेवार्थ सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद घेण्याबाबत.
५. अनुकंपा नियुक्ती नंतर यांचे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करणे.
६. शिक्षकेत्तर पदोन्नती नंतर एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करणे.
७. बदलीनंतर एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे नावे (DETTACH /ATTACH) डिटॅच/अॅटॅच करणेबाबत.
८. इतर कारणास्तव एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये जन्म दिनांक व सेवानिवृत्ती दिनांक बदल करणे.
९. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये कॅस पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना वेतन लागू करणे.
१०. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे (Inner व Report) मधील दुरूती करणे, उदा. (GPF/NPS शेडूलची माहिती)

**कृ.मा.प**

➢ **नवनियुक्त शिक्षक कर्मचारी यांचे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करणे.**

जे पद सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करावयाचे आहे त्याची खालील विहीत नमुन्यातील माहिती सादर करावी.

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव | विषयाचे पद/जे पद एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करावयाचे आहे तो विषय व पद | १.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित अनुज्ञेय पदे | भरलेली पदे | एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नवीन पदे निर्माण करावयाची संख्या | महाविद्यालय सेवार्थ आयडी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

१. शिक्षक पदासाठीचे नाहरकत प्रमाणपत्र.
२. शिक्षक पदासाठी दिलेल्या जाहिरातीच्या प्रती.
३. संचालनालय तसेच शासन मान्यता आदेशाची प्रत.
४. नाहरकत प्रमाणपत्र.
५. बिंदू नामावली प्रत.
६. महाविद्यालय निवड समिती अहवाल.
७. विद्यापीठ मान्यता आदेशाची प्रत.
८. नियुक्ती आदेश.
९. रुजु अहवाल.
१०. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचे मंजुरी आदेश.
११. शिक्षक पदाची वेतनिश्चिती तसेच वेतनपडताळणी ( ७ व्या वेतन आयोगानुसार ) छायाकिंत प्रत.
१२. एस.एस.सी, उत्तीर्ण प्रमाणपत्रावर जन्म दिनाकांची नोंद तसेच संपूर्ण शैक्षणिक कागदपत्रे.
१३. सेवापुस्तकातील प्रथम पृष्ठ नोंदीची प्रमाणित केलेली प्रत.
१४. TEMPLATE-४ ची प्रत त्यानुसार सर्व कागदपत्रे.
१५. शासन निर्णय दि. २४.६.२०२१ व उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय दि. ३.११.२०१८ च्या अनुषंगाने अभिप्राय.
१६. सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेली दि. १/१०/२०१७ नंतरची वर्षनिहाय २०१८-१९ ते २०२४-२५ अभ्यासक्रम निहाय प्रवेश क्षमता, प्रवेशित विदयार्थी तपशीलाची प्रत.
१७. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये निर्माण केल्या पदापैकी भरलेल्या व रिक्त पदांची लगतच्या वेतन देयक अनुदानाची छायाकिंत प्रत.
१८. संबंधित कर्मचारी यांची नियुक्ती ही १००, टक्के अनुदानित पदावर करण्यात आली आहे. व सबंधिताची ज्या पदावर नियुक्ती करणेत आलेली आहे, त्या पदासाठी असलेली शैक्षणिक अर्हता व अटींची पूर्तता सबंधित कर्मचारी करीत आहेत तसेच संबंधिताची निवड ही विहित व विधिवत मार्गाने झाली असल्याचे प्राचार्य, यांचे प्रमाणपत्र.
१९. सदर महाविदयालयाने त्यांचे Login Id मध्ये यापूर्वी एचटीई सेवार्थ प्रणाली कार्यान्वित होत असताना सबंधित पद निर्माण केले आहे. तथापि सदर पद रिक्त असल्याने अथवा अन्य कारणास्तव Detach केले किंवा कसे? याबाबत खात्री करून महाविदयालय यांचे प्रमाणपत्र.

➢ **प्राचार्य यांचे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ६०, वर्षावरून ६२ वर्ष दिनांकामध्ये दुरूस्ती करणे.**

१. संबंधित प्राचार्य यांचे सेवार्थ प्रणालीमध्ये करावयाच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादा वाढीबाबत संस्थेच्या ठरावाची प्रत.
२. एचटीई सेवार्थ प्रणालीमधील प्राचार्यांच्या मूळ नोंदीचे स्टेटमेंट
३. प्राचार्य पद भरतीसाठी शासन/संचालक/सहसंचालक/विद्यापीठ यांनी दिलेले नाहरकत प्रमाणपत्र प्रत.
४. प्राचार्यांचे चेंजिस-इन-स्टाफ मान्यता पत्राची प्रत
५. सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची साक्षांकित छायाप्रत.
६. प्राचार्य यांचे सेवेत खंड नसल्याबाबत संबंधित संस्था व सहसंचालक यांचे प्रमाणपत्र.
७. विद्यापीठ मान्यता आदेश,
८. विद्यापीठ निवड समिती अहवाल

**कृ.मा.प.**

९. रुजु अहवाल
१०. जाहिरात मान्यता आदेश
११. सबंधित प्राचार्य यांचे एचटीई सेवार्थप्रणालीमध्ये अंतिम वेतन प्रदान कोणत्या महिन्यात करण्यात आले त्याबाबतची ( Payslip) प्रत.
१२. सेवार्थ प्रणालीत प्राचार्य यांचा सदयस्थितीत नमुद असलेल्या सेवानिवृत्ती दिनांकाबाबत (Screen shot) ची प्रत.
१३. सबंधित प्राचार्य यांची एका महाविदयालयातून दुस-या महाविदयालयात बदली झालेली असल्यास त्यांचे प्रथम नियुक्तीपासून ते अदयापपर्यंत कोणकोणत्या महाविदयालयात कार्यरत होते त्याचा कालावधी, पदनाम, महाविदयालयाचे नाव इ. तपशील देणेत यावा. तसेच त्यांचे बदली आदेश, कार्यमुक्ती आदेश, बदलीस देणेत आलेली विदयापीठ मान्यता इ. माहिती देखील देणेत यावी.
१४. एचटीई सेवार्थ प्रणालीमधील सबंधित प्राचार्य यांची (Template ४) मध्ये भरणेत आलेल्या माहितीची प्रत
१५. संबंधित प्राचार्य यांची नियुक्ती सावधी कालावधीकरिता करण्यात आली असल्यास प्रथम ०४ वर्षे नियुक्ती तसेच दुस-या ०५ वर्षे कालावधीकरिता वेळोवेळी संस्थेकडून धारणाधिकार घेण्यात आला आहे काय ? याबाबत अभिलेख सादर करणेत यावेत.
१६. तसेच संबंधित प्राचार्य यांची प्राचार्य पदी पुर्ननियुक्ती करणेत आलेली असल्यास संस्था ठराव, विद्यापीठ मान्यता, (External Peer Review Committee Report) ची प्रत, प्राचार्य पदावरील पुर्ननियुक्ती आदेश रुजू अहवालाची प्रत.

➢ **एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये प्राचार्य यांचे वयमर्यादा ६२ वर्षावरून ६५ वर्ष दिनांकमध्ये दुरूस्ती करणे.**

१. विहित प्रपत्र स्टेटमेंट
२. संबधित प्राचार्य यांचे वयोमर्यादा वाढीबाबत संस्थेचा ठराव.
३. सहसंचालक, उच्च शिक्षण, यांनी वयोमर्यादा वाढीसंदर्भातील शिफारस पत्र
४. एचटीई सेवार्थ प्रणालीमधील प्राचार्य यांच्या मूळ नोंदीची स्टेंटमेंट
५. प्राचार्य, पदासाठीचे नाहरकत प्रमाणपत्र.
६. प्राचार्य, पदासाठीची जाहिरात.
७. प्राचार्य, पदासाठी नियुक्ती विद्यापीठ निवडसमिती अहवालाची प्रत
८. विद्यापीठ प्राचार्य मान्यतेची पत्राची छायाकिंत प्रत
९. प्राचार्य, चेचिंगइन- स्टाफ मान्यतेची प्रत
१०. प्राचार्य, पदाची नियुक्ती आदेशाची प्रत
११. प्राचार्य पदी रूजु अहवालाची प्रत.
१२. प्राचार्य पदी कायम केलेल्या आदेशची प्रत.
१३. एस.एस.सी, उत्तीर्ण ( जन्म दिनाकांची नोंद असलेले) बोर्ड प्रमाणपत्र
१४. सेवापुस्तकातील पहिल्या पानाची छायाकिंत प्रत.
१५. प्राचार्य, पदाची वेतननिश्चिती (५ व्या वेतन आयोगानुसार) छायाकिंत प्रत.
१६. प्राचार्य, पदाची वेतननिश्चिती (६ व्या वेतन आयोगानुसार) छायाकिंत प्रत.
१७. प्राचार्य, पदाची वेतननिश्चिती (७ व्या वेतनआयोगानुसार) छायाकिंत प्रत.
१८. प्राचार्य विद्यापीठ चेंजिग इन स्टाफला मान्यता पत्र.
१९. महाविद्यालय, शासन निर्णयातील तरतुदीनुसार ग्रामीण डोंगराळ व आदिवाशी भागात येत असेल तर तहसिलदार/ ग्रामविकास अधिकारी / सरपंच यांचे प्रमाणपत्र सादर करावे.
२०. प्राचार्य, यांच्या सेवेत खंड नसल्याबाबत संबधित संस्था व सहसंचालकांचे प्रमाणपत्र

➢ **प्राचार्य पदी निवड केलेल्या अध्यापकांची एचटीई सेवार्थ सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद घेण्याबाबत.**

१. प्राचार्य पद भरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र.
२. निवड समितीचा अहवाल व विद्यापीठ मान्यता.
३. वेतन निश्चिती.
४. वेतन निश्चिती पडताळणी.

**कृ.मा.प.**

५. रुजु अहवाल.

- **अनुकंपा नियुक्ती नंतर एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करणे.**

१.अनुकंपा नियुक्तीबाबतचे संचालनालयाच्या मान्यता पत्राची,
२. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचे कार्यालयीन मान्यतेची प्रत.
३. संबंधित संस्था/ व्यवस्थापनोचे नियुक्ती आदेश
४. रुजु अहवाल.
५.विभागीय संहसंचालक यांनी केलेली वेतननिश्चतीची प्रत.
६. लेखाधिकारी अनुदाने यांनी वेतन पडताळणी केल्याची प्रत.
७. विभागीय सहसंचालक यांनी दि. ०१.१०.२०११ व ०१.१०.२०१७ च्या विद्यार्थिसंख्येवर आधारित दिलेल्या पदमान्यतेच्या पत्राची प्रत
८. एस.एस.सी, उत्तीर्ण प्रमाणपत्रावर जन्म दिनाकांची नोंद तसेच संपूर्ण शैक्षणिक कागदपत्रे
९. सेवापुस्तकातील नोंदी, प्रमाणित सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची प्रत सोबत जोडलेली आहे.
१०. ज्या पदासाठी नाव समाविष्ठ करावयाचे आहे. त्या पदाचे एच.टी. ई सेवार्थ प्रणालीमध्ये एकुण भरलेल्या व रिक्त पंदाची माहिती
११. TEMPLATE-४ ची प्रत तसेच त्यानुसार सर्व कागदपत्रे.

- **शिक्षकेत्तर कर्मचारी नियमित पदोन्नती नंतर एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ठ करणे.**

१. संस्था महाविद्यालयाचे पदोन्नतीच्या आदेशाची प्रत.
२. सदर पदोन्नती सेवाज्येष्ठतेनुसार दिली असल्यास संबंधित महाविद्यालय व विभागीय सहसंचाल यांचे प्रमाणपत्र.
३. पदोन्नतीच्या टिकाणी रुजु झाल्याचा रुजु अहवाल.
४. पदोन्नती नंतर विभागीय सहसंचालक यांनी केलेल्या वेतननिश्चितीची प्रत.
५. लेखाधिकारी अनुदाने यांनी वेतनपडताळणी केल्याची प्रत.

- **बदलीनंतर एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे नावे (DETTACH /ATTACH) डिटॅच/ॲटॅच करणेबाबत.**

१.बदली आदेश
२. महाविद्यालयामधुन कार्यमुक्त केल्याचे आदेश.
३. बदली ठिकाणी रुजु झल्याचा अहवाल.
४.शिक्षकीय कर्मचा-याबाबतीत विद्यापीठ बदलले असल्यास विद्यापीठाची बदली मान्यतेची प्रत.
५.कर्मचा-याचा नियुक्ती दिनांक/ संबधित कर्मचा-याचे पद अनुदानित आहे किंवा विनाअनुदानित याबाबतचे विभागीय सहसंचालक यांचे प्रमाणपत्र.
६. दि.१.१०.२०११ व दि. १.१०.२०१७ रोजीच्या विद्यार्थिसंख्येवर आधारित पद मान्यतेची प्रत
४.एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये निर्माण केल्या पदापैकी भरलेल्या व रिक्त पदांची लगतच्या वेतन देयक अनुदानाची छायाकिंत प्रत.

| अ.क्र | कर्मचा-याचे नांव व पदनाम | कर्मचारी सेवार्थ आयडी | शिक्षकीय कर्मचा-याचा विषय | बदली आदेश दिनांक | बदलीच्या ठिकाणी झाल्याचा दिनांक | ज्या महाविद्यालयामधुन बदली झाली आहे त्या महाविद्यालयाचे नाव डी.डी.ओ.क्रमांक | ज्या महाविद्यालयामध्ये बदली झाली आहे त्या महाविद्यालयाचे नाव व डी.डी .ओ ओ.क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

- **इतर कारणास्तव एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये जन्म दिनांक व सेवानिवृत्ती दिनांक बदल करणे.**

१. ज्या कारणामुळे सेवार्थ प्रणालीमध्ये जन्म दिनांक दुरूस्ती करावयाचे आहे त्याबाबतचा संपूर्ण सविस्तर अहवाल.
२. नियुक्ती आदेश
३. रुजु अहवाल.
४. एस.एस.सी, उत्तीर्ण प्रमाणपत्रावर जन्म दिनाकांची नोंद तसेच संबंधित संपूर्ण शैक्षणिक कागदपत्रे
५. सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची साक्षाकिंत प्रत.
६. आधार कार्ड, पॅन कार्ड,
७.संबंधित कर्मचारी याचे हमीपत्र
८. आहरण व संवितरण अधिकारी यांचे जन्म दिनांक दुरूस्ती बाबतचे प्रमाणपत्र

**कृ.मा.प.**

- **एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये कॅस पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना लागू करण्यासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावी.**
  १.शिक्षकेत्तर कर्मचारी पदोन्नतीच्या आदेशाची प्रत.
  ३.शिक्षक कर्मचारी निवडसमिती अहवालाची प्रत व इतर अनुषंगिक कागदपत्रे.
  २.विभागीय सहसंचालक यांनी पदोन्नती नंतर वेतननिश्चितीस दिलेल्या मान्यतेची प्रत.
  ३.लेखाधिकारी यांनी केलेल्या वेतननिश्चती पडताळणीची प्रत.
- **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे (Inner व Report) मधील दुरूती करणे, उदा. (GPF/NPS शेडूल मधील माहिती)**
  १.संबंधित कर्मचारी यांचे संपूर्ण नाव व पदनाम
  २.एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये जो बदल करावयाचा आहे, त्याबाबतची संपूर्ण कागदपत्रे.
  ३.ज्या तपशिलामध्ये बदल करावयाचे आहे, त्याबतचा अहवाल.
  ४. तसेच ज्या कारणास्तव दुरूस्ती करावयाची आहे त्याबाबत लगतच्या महिन्याचे वेतन अनुदान देयकाची प्रत

**वरील सर्व नमूद एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये बदल करण्यासाठीच्या प्रस्तावासोबत खालील विवरणपत्रातील माहिती सादर करण्यात यावी**.

**विद्यापीठ तसेच महाविद्यालय डी.डी.ओ क्रमांक--**

| अ.क्र | महाविद्यालयाचे नांव | कर्मचारी नांव | पदनाम | सेवार्थ आयडी | डी. डी. क्रमांक | पदोन्नती पुर्वीचे मुळ वेतन | पदोन्नती नंतरचे मुळ वेतन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

उपरोक्त वरील मुद्दा क्र. १. ते १० बाबतचे संपूर्ण प्रस्ताव विभागीय सहसंचालक कार्यालयात सादर करतांना प्रस्तावासोबत वरीलप्रमाणे सहपत्रीत करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत याची सर्व आहरण व सवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

Signed by Parag
Purushottam Masram
Date: 13-10-2025 14:43:34

**(डॉ. पराग मसराम )**
सहसंचालक,
उच्च शिक्षण, जळगांव विभाग जळगांव

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर पुणे-४११०१६